# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in

---

क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 340 /2020 दिनांक: 22 /05/2020

---

वाचा – 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांचे पत्र दिनांक 20.5.2020

**स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभागाची सेवा फक्त कोरोना पॉजिटीव्ह गर्भवती तसेच प्रसुती झालेल्या माता करिता राखीव ठेवणे बाबत**

## *आदेश*

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि,**

**ज्याअर्थी**, करोना पॉजिटीव्ह गर्भवती तसेच प्रसुती झालेल्या गर्भवती मातांची वाढती लक्षात घेता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय अकोला येथील स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभागाची सेवा (प्रसुती पूर्व तपासणी, प्रसुती सिझेरीयन शस्त्रक्रिया ई.) फक्त कोरोना पॉजिटीव्ह मातांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात. असे अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांनी कळविले आहे. **आणि,**

**त्याअर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर,**भाप्रसे **जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला, आपत्ती व्यवस्थापन कायदा**- 2005, **साथरोग अधिनियम** 1897 **मधील खंड** 2, 3 **व** 4 **व महाराष्ट्र शासनाची दिनांक** 14 **मार्च** 2020 **चे अधिसूचना** अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय अकोला यांनी कळविल्यानुसार खालील प्रमाणे आदेश पारीत करित आहे.

1. जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला तसेच इतर खाजगी रुग्णालये येथे जर संशयीत गर्भवती तसेच प्रसुती झालेल्या मातांचे Throat Swab/Nasophyrangeal Swab घेतलेले असतील, तर त्यांना त्याच संस्थेमध्ये अलगीकरण कक्षात ठेवण्यात यावे.
2. गर्भवती मातांचा अहवाल पॉझिटीव्ह आल्यास त्या रुग्णास त्वरीत शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील स्त्री रोग व प्रसुती शास्त्र विभागात पुढील उपचारा करिता संदर्भीत करण्यात यावे.
3. शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय अकोला येथील स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभागात कोव्हीड-19 कोरोना पॉझिटीव्ह गर्भवती तसेच प्रसुती झालेल्या मातांना उपचाराकरिता राखीव केल्यामुळे उर्वरित गर्भवती महिलांना पुढील सेवा जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला येथे देण्यात याव्यात, याबाबत वैद्यकिय अधीक्षक, जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला यांनी आवश्यक ती व्यवस्था करावी.
4. रुग्ण सेवा सुरळीत राहण्याचे दृष्टीने कोव्हीड-19 निगेटिव्ह गर्भवती महिलांना अतिदक्षता विभागांची सेवांची गरज असल्यास, MJPJY संलग्नीत अतिदक्षता विभागात सेवा देण्यात याव्यात.

..2..

सदर आदेश नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत पारीत करण्यात येत असल्यामुळे तात्काळ लागू करण्यात येत आहे.

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता,** (1860 **चा** 45 ) **याच्या कलम** 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक** 22 **मे** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी –**

1. मा. आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
3. आयुक्त, महानगरपालिका अकोला
4. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
5. जिल्हा शल्य चिकित्सक सर्वोपचार रुग्णालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
6. अधीक्षक, जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. उपविभागीय अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**